शनिवार दि. १७ डिसेंबर २०११ सांस्कृतिक

# माडगुळला 'गदिमा गाणी आणि आठवणी'

पुणे दि. १६ (प्रतिनिधी)

कवी ग. दि. माडगुळकर यांच्या ३४ व्या स्मृतिदिनानिमित्त 'गदीमा गाणी आणि आठवणी' या कार्यक्रमाचे आयोजन पुण्याच्या गायिका शुभांगी मुळे यांनी माडगुळ येथे केले. यावेळी ग.दि.मां.ची गाजलेली चित्रपट गीते, भक्तीगीते, भावगीते, रामायणातील गीते, देशभक्तीपर गीते सादर केली. यामध्ये जिवलगा कधी येशील तू, फड सांभाळ तुऱ्याला, बुगडी माझी सांडली ग, अशा गाण्यांनी रसिकांना मंत्रमुग्ध केले. हेमंत वाळूंजकर, अविनाश सलगकर यांनीही घनघनमाला नभी दाटल्या, झाला मल्हार पंढरीनाथ ही गाणी सादर केली. जयंत साने (हार्मोनियम), सस्मित रुद्र (सिंथेसाईजर), मोहन पारसनीस (तबला), हेमंत पोटफोडे (तालवाद्य) यांनी साथसंगत केली. कार्यक्रम माडगुळे येथील ग. दि. माडगुळकर, कामगार कल्याण मंडळ यांच्यावतीने आयोजित करण्यात आला.

(4)

## अवतीभवती

रविवार पुणे शहर १८ डिसेंबर २०११

# गदिमांच्या स्मृतिदिनी माडगुळेमध्ये 'गदिमा : गाणी आणि आठवणी'

पुणे, ता. १७ : गायिका शुभांगी मुळे आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी माडगुळे (सांगली) येथे 'गदिमा : गाणी आणि आठवणी' कार्यक्रम सादर करून महाकवी ग. दि. माडगूळकर यांना स्वरांजली वाहिली. हे कलाकार पुण्याहून माडगुळे येथे गेले होते. तेथील ग. दि. माडगूळकर हायस्कूलमध्ये कार्यक्रम झाला. त्यात शुभांगी मुळे, हेमंत वाळूंजकर व अविनाश सलगरकर यांनी गाणी सादर केली. त्यांना जयंत साने (हार्मोनिअम), मोहन पारसनीस (तबला), सस्मित रुद्र (सिंथेसायझर) व हेमंत पोटफोडे (तालवाद्य) यांनी साथ केली. श्रीधर माडगूळकर यांनी मार्गदर्शन केले.